

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या भुयारी मार्गाचे काम शुक्रवारी सकाळी सुरू करण्यात आले. त्यासाठी माहीम येथील नयानगर येथे प्रचंड टनेल बोअरिंग मशीनचा वापर करण्यात येत आहे. (छायाचित्र : विजय बाटे) बातमी पान...II

# कुलाबा-सिप्झ मेट्रो ३च्या भुयारी मार्गाचे काम सुरू

मुंबई, ता. १० : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या भुयारी मार्गाचे काम शुक्रवारी (ता. १०) सकाळी सुरू करण्यात आले. माहीम परिसरातील नया नगरपासून हे काम सुरू करण्यात आले. ही मेट्रो सेवा ३ डिसेंबर २०२१ ला सुरू करण्यात येईल, असा विश्वास एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

मेट्रोच्या ३३.५ किलोमीटर भुयारी मार्गाचे काम करण्यासाठी १७ टनेल बोअरिंग मशीनचा वापर करण्यात येणार आहे. हे मशीन भूगर्भात २५-३० मीटरखाली जाऊन खोदकाम करते. सिद्धिविनायक ते शीतलादेवी स्टेशन मार्गिकेसाठी माहीम येथील नयानगर येथे दोन यंत्रांद्वारे काम सुरू करण्यात आले आहे. प्रसिद्धिमाध्यमांच्या प्रतिनिधींना माहिती देण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने शुक्रवारी (ता. १०) पाहणी दौरा काढला होता.